# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 27/01/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा घोघरा महादेव मंदीर जवळ पेंच नदीच्या पाण्यात पारशिनी येथे दिनांक 26/01/2021 चे 17.07 वा. दरम्यान सागर हरिकीसन गिरी(मृतक), वय 23 वर्ष, बैलवाडा हा दिनांक 26/01/2021 चे 12.00 वा. दरम्यान मौजा बैलवाडा येथून गावातील आपले मित्रांसोबत महादेव मंदीर घोघरा येथे फिरायला आला होता. तो पेंच नदीचे पाण्यात आंघोळ करीत असता पाण्यात बुडून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विकास उर्फ कैलाश रत्नाकर गिरी, वय 38 वर्ष, रा. बैलवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप बासोडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा वडली सावरगाव येथे दिनांक 26/01/2021 चे 09. 30 वा. ते 10.00 वा. दरम्यान निलेश चंद्रमणी तागडे (मृतक), वय 26 वर्ष, रा. मसली हा सकाळ पासुन काही बोलत नव्हता व पागल सारखा करीत होता. मृतक हा अचानकपणे शेतातील विहीरीकडे एकटाच पळत गेला आणि विहीरीत उडी मारली. मृतक हा विहीरीच्या पाण्यात बुडून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चंद्रमणी संतोषराव तागडे, वय 50 वर्ष, रा. मसली यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर पाटील नगर गहुहिवरा रोड कांद्री कन्हान येथे दिनांक 26/01/2021 चे 06:00 वा. ते 06.30 वा. दरम्यान हरिदास जबिल सोमकुवर, वय 70 वर्ष, रा. पाटील नगर, गहुहिवरा रोड कांद्री कन्हान यांनी अज्ञात कारणातुन त्यांच्या राहत्या घराच्या जांबाच्या झाडाला रस्सी व दुप्पटयाने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरेश हरिदास सोमकुवर, वय 50 वर्ष, पाटील नगर, गहुहिवरा रोड कांद्री कन्हान यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सहारे 9309966392 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर